# लढा कोरोना विरुद्ध...

*मितेश घट्टे*

पोलीस उपायुक्त,
विशेष शाखा, पुणे शहर
ghattemitesh@gmail.com

कोरोनाच्या संकटाने जगण्यातील सहजता निघून गेली. जशी सहजता निघून गेली तसेच जगणेही बदलून गेले. या बदललेल्या वातावरणात जगण्यासाठीची धडपड सुरू झाली. एरव्ही गुन्हेगारीवर वचक ठेवणारे पोलीस सर्वसामान्यांच्या सुरक्षेसाठी रस्त्यावर उभे ठाकले. गुन्हेगारांना धडा शिकवणारे पोलीस छुप्या कोरोनाला रोखण्यासाठी रात्रीचा दिवस करू लागले. जीवाची बाजी लावून प्राणपणाने लढू लागले. कर्तव्य बजावताना काही पोलीस अधिकारी, कर्मचारी कोरोनाचे बळी ठरले. पोलिसांचे हे बलिदान महाराष्ट्र नक्कीच विसरणार नाही.

कोरोना... (कोविड-१९) रोगाने महासत्ता असलेल्या अमेरिकेचे कंबरडे मोडले. जगातील बलाढ्य देश या रोगाचा सामना करताना अक्षरशः मेटाकुटीला आले. त्यामुळे भारत कोरोनाशी कसा लढा देणार याची चिंता होती. त्यातही लोकसंख्या अधिक असलेल्या महाराष्ट्रात काय परिस्थिती उद्भवणार याची चिंता प्रत्येकालाच होती. कारण कोरोनाचे संकट व्यवस्थेला आणि सर्वसामान्य माणसालाही नवीनच आहे. कोरोना हा संसर्गजन्य रोग असल्याने आरोग्य व्यवस्थेवर मोठी जबाबदारी पडणार हे स्पष्टच होते. बघता बघता कोरोनाने राज्यभर हातपाय पसरले. पुण्यासारख्या विस्तारलेल्या शहरातही कोरोना घुसला. पुण्या-मुंबईसह राज्यभरात लॉकडाऊन झाले. अचानक आलेल्या संकटाने माणसांना असतील त्या परिस्थितीत घरात होमक्वारंटाईन व्हावे लागले. लॉकडाऊनच्या कडक अंमलबजावणीसाठी प्रत्येक गल्लीत पोलीस बंदोबस्त लागला. कोरोनाचा रुग्ण सापडला की तो परिसर पूर्ण सील करायचा, तिथे दिवसरात्र खडा पहारा द्यायचा, तिथली एकही व्यक्ती घराबाहेर पडू नये याकरिता पोलिसांची धडपड सुरू झाली.

या काळात कोरोनाच्या संक्रमणशील व प्रतिबंध क्षेत्रात कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांची काटेकोर

अंमलबजावणी करण्याची निकड निर्माण झाली आहे. उपलब्ध मनुष्यबळाला मदत होण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१च्या २१व्या कलमानुसार २० ते ५० वर्षे वयोगटातील पात्र व्यक्तींची विशेष पोलीस अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त केलेल्या सर्व विशेष पोलीस अधिकाऱ्यांचे वेबिनारव्दारे प्रशिक्षण घेण्यात आले असून सर्वांना आरोग्य विभागाच्या निर्देशाप्रमाणे मास्क, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायजर यांचा अनिवार्य वापर करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच या सर्व सुविधा पोलीस स्टेशन स्तरावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

खालील कामकाजात विशेष पोलीस अधिकारी प्रशासनाला मदत करतात.

१. सामाजिक अंतर (Social Distancing) जनजागृती.

२. कोविड -१९ ने संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांचे समुपदेशन.

३. कोरोना संसर्ग सदृश्य लक्षणे असलेल्या व्यक्तींना फ्ल्यू क्लिनिक येथे उपचारार्थ पाठवणे.

४. पुणे महानगरपालिकेने सुरू केलेल्या 'फ्ल्यू क्लिनिक' ची माहिती नागरिकांना देणे.

५. कोरोना रुग्णाच्या संपर्कातील सर्व व्यक्तींची माहिती संकलित करणे. (Contact Tracing)

६. सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, झोपडपट्टी परिसरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांचे निर्जंतुकीकरण तसेच सॅनिटायजर, ग्लोव्हज व मास्क यांचा वापर करण्याबाबत जनतेमध्ये जागृती करणे इत्यादी अनेक बाबींवर पोलीस प्रशासनाने लक्ष केंद्रित केले आहे.

मानवी पद्धतीने वैद्यकीय सर्वेक्षणाद्वारे कोरोनाबाधित संशयितांचा शोध घेताना रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांकडे प्रत्यक्ष चौकशी केली जाते. परंतु या रुग्णांकडून वस्तुस्थिती समजण्यास मर्यादा आहेत. त्यामुळे पोलिसांनी देऊ केलेली तांत्रिक मदत बाधितांचा शोध घेण्यास उपयोगी ठरते. गुन्हा शाखेकडून बाधित रुग्णांच्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करून त्याच्या निकट संपर्कातील व्यक्तींची माहिती गोळा केली जाते. तसेच कोरोनासदृश्य लक्षणांसाठी डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधं खरेदी करणाऱ्या ग्राहकांचीही दैनिक माहिती विशेष शाखेकडून संकलित करून मनपा आरोग्य विभागाला देण्यात येते. सदर दोन्ही पद्धतीने समोर आलेल्या माहितीच्या आधारे मनपा वैद्यकीय पथक संबंधितांची प्रत्यक्ष किंवा फोनवरून चौकशी करून उपचाराची पुढील दिशा ठरवते.

पुणे शहरातील कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या विरोधात करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना शासनस्तरावरील विविध विभागांकडून राबविल्या जात आहेत. परस्पर संपर्कातून विषाणूचा संसर्ग वाढण्याची सर्वाधिक शक्यता असल्याने गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे लॉकडाऊन स्थितीत नागरिकांच्या संचारावर व हालचालींवर बंधने घातल्याने व्यवहार व जनजीवन ठप्प झाले आहे.

अशा बिकट परिस्थितीत अल्प उत्पन्न असलेल्या रोजंदार मजुरांना संबंधित आस्थापना मालकांनी रोजगार वा मासिक पगार चालू ठेवावा असे निर्देश शासनाकडून वेळोवेळी देण्यात आले होते. परंतु त्याबाबत त्यांनी असमर्थता व्यक्त केल्याने कामगारवर्गावर आर्थिक अरिष्ट कोसळले. कोरोना विषाणूचे संकट कामगारांसाठी मानसिक व सामाजिक स्तरावर भीती निर्माण करणारे ठरले. त्यामुळे आपल्या मूळ गावी परत जाण्याविषयी कामगारांच्या मनात ओढ निर्माण झाली. वास्तविक पाहता, उदरनिर्वाहाचे साधन गमावलेल्या निराधारांना शासनस्तरावर सामाजिक संघटनांच्या मदतीने निवारा व भोजन व्यवस्था उपलब्ध करून दिली जात होती. असे असूनही कामगारांच्या मनामधील अस्वस्थता कमी होत नव्हती. सुरुवातीच्या निर्बंधांच्या कालावधीत प्रवासास मनाई असल्याने कामगारांमधील अस्वस्थता, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाला आमंत्रण देणारी ठरू शकली असती. मात्र सोशल पोलिसिंग सेलच्या माध्यमातून कायम ठेवलेला संपर्क व समन्वयामुळे कामगारांच्या मनामधील अस्वस्थतेला बांध घालण्यात पुणे पोलिसांना यश आले.

पश्चिम महाराष्ट्राला महापुराच्या संकटाने वेढले होते तेव्हासुद्धा पोलिसांनीच बुडणाऱ्यांचे संसार आणि जीव वाचवले होते. मात्र महापुराचे संकट डोळ्यांनी दिसत होते. ते कसे येणार... कुठपर्यंत पसरणार याचाही अंदाज करता येत होता. त्यामुळे त्या संकटाचा सामना करताना पोलिसांनी जीवाची बाजी लावली. मात्र कोरोनाचे संकट दिसत नाही आणि ते कसे व कोणाच्या माध्यमातून येईल हेही सांगता येत नाही. या छुप्या संकटाचा सामना करण्यासाठी आयुक्त डॉ. के. वेंकटेशम आणि पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या नेतृत्वाखाली पुणे शहर पोलीस प्राणपणाने लढत आहेत. कोरोनाच्या संकटात लढणारे पोलीस दोन महिन्यांपासून घरी गेलेले नाहीत. कोणाच्या घरी लहान मुले आहेत तर कोणाचे वृद्ध आईवडील वेगवेगळ्या आजारांशी झुंजत आहेत. मात्र त्यांचा आधार असलेला कर्ता 'पोलीस' म्हणून कोरोनाशी लढत आहे... सामान्यांचा जीव वाचवण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालत आहे. परंतु प्रत्येकाच्या मनात एकच विश्वास आहे...

हम होंगे कामयाब...